# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२
फॅक्स् : ०७२४-२२५८३७२


वाचा : १) DAHD-14043/01/2025 पदुम—४(१४२२५२८) दि. १९ जुन—२०२६
२) DAHD-14043/01/2025 पदुम—४(१४२२५२८) दि. १४ जुलै—२०२६
३) SOU MOTO रिट याचीका (सिव्हिल) क्र. ०५/२०२५ दिनांक १९.०५.२०२६
४) संकीर्ण—१५२६/प्र.क्र.१५४/६अे दि. २२ जुलै—२०२६

## परिपत्रक

जा.क्र.साप्रवि/परिपत्रक/ 1564 /२०२६. दिनांक. 24/07/२०२६.

भटक्या जनावरामुळे मानवाच्या दैनदिंन जिवनात होणारा उपद्रव तसेच मानव श्वान संर्घषाच्या गंभीर घटनाच्या पार्श्वभुमीवर मा. सर्वोच्च न्यायालयाने SOU MOTO रिट याचीका (सिव्हिल) क्र. ०५/२०२५ हि दाखल करून घेतली आहे. सदर याचीकेवर मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८.०८.२०२५, दिनांक ०७.११.२०२५ व दिनांक १९.०५.२०२६ रोजी दिलेल्या अंतरीम निर्णयान्वये भटक्या जनावरामुळे भटक्या जनावरामुळे मानवाच्या दैनदिंन जिवनात होणारा उपद्रव तसेच मानव श्वान संर्घष टाळण्यासाठी विविध उपाय योजना करण्याचे संदर्भीय पत्राद्वारे निर्देश दिले आहेत. वरील संदर्भाकिंत पत्रें सविस्तर तपशिलासाठी सोबत जोडण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या अंतर्गत येत असलेल्या सर्व कार्यालय/विभाग प्रमुख, यानां कळविण्यात येते की, उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने आपण आपल्या कार्यालयस्तरावर घेतलेली खबरदारी/उपाययोजना या बाबतची माहिती संबधीत विभागाच्या नियंत्रण अधिकारी यानां पाठविण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक २८/०७/२०२६ पर्यंत या कार्यालयास सादर करावा.

( प्रिति गेडाम )
कुलसचिव,
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

सोबत :— वरील प्रमाणे

प्रतिलीपी उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित:

१. संचालक (सर्व) ——————
२. अधिष्ठाता (सर्व) ——————
३. सहयोगी अधिष्ठाता (सर्व)——————
४. वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व)——————

Circular File

५. कार्यक्रम समन्वयक कृषि विज्ञान केंद्र, (सर्व)————————
६. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, (सर्व)——————————
७. प्रभारी अधिकारी (सर्व)——————————————
८. प्रभारी अधिकारी कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष ARIS CELL यानां विद्यापीठ संकेत स्थळावर पसिध्दी करीता
९. विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख/नियंत्रण अधिकारी (सर्व)
१०. विद्यापीठ नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता/विद्यापीठ ग्रंथपाल/विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी/ विद्यार्थी कल्याण अधिकारी
११. उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/विवि)
१२. सहाय्यक कुलसचिव (आस्थापना/साप्रवि/परिक्षा/समिती/प.शि.स/कृ.म.वि/उ.वि.म/व.मि.म./कृषि अभि./कृ.जै.मा./अ.म.मा )
१३. सहाय्यक नियंत्रक (अंदाज/मुख्यालय)/अधिदान व लेखाधिकारी अकोला/ नागपुर
१४. मा. कुलगुरूंचे स्विय सहाय्यक/तांत्रिक सचिव यानां माहिती करीता
१५. कुलसचिव यांचे स्विय सहाय्यक डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला
१६. सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, अकोला.
१७. ————————————————————————

५


महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मंत्रालय (विस्तार), दालन क्र.५१८,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२.

ई-मेल- us.adf४-mh@gov.in


---

क्रमांक : DAHD-१४०४३/१/२०२५ पदुम -४ (१४२२५२८) दिनांक : १४ जुलै, २०२६

<u>न्यायालयीन प्रकरण / महत्त्वाचे</u>

प्रति,

१. अतिरिक्त मुख्य सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अप्पर मुख्य सचिव, नगर विकास विभाग-२, मंत्रालय, मुंबई.
४. अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अप्पर मुख्य सचिव, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव,ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव, शालेय शिक्षण, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव; क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व अन्न व औषध प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. सचिव, अल्पसंख्यांक विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७.कुलगुरु, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठ, नागपूर.

विषय:- SOU MOTO रिट याचिका (सिव्हिल) क्र. ०५/२०२५
मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १९/०५/२०२६ रोजी दिलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणीबाबत.

संदर्भ:- १. SOU MOTO रिट याचिका (सिव्हिल) क्र. ०५/२०२५ संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले दि. १९/०५/२०२६ रोजीचे निर्देश.

२. मा. केंद्रीय सचिव, पशुपालन व दुग्धविकास विभाग, मत्स्यपालन, पशुपालन व दुग्धविकास मंत्रालय, भारत सरकार यांचे अ. शा. पत्र. क्र. V-११०११(११)/१६/२०२५-AWB(E-३८६३५) दि.०९.०६.२०२५

21/07/26

C:\Users\१७५८८\Desktop\आयुक्तांना पाठवावयाची पत्रे.Docx

३. सचिव (पदुम) यांचे संबंधित विभागांना दिलेले अ.शा. पत्र क्र. DAHD-४०४३/१/२०२५ पदुम-४ (१४२२५२८) दि. १९.०६.२०२६.

महोदय,

भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव-श्वान संघर्षाच्या गंभीर घटनांच्या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने SOU MOTO रिट याचिका क्र. ०५/२०२५ संदर्भात सुनावणीअंती दि. १९/०५/२०२६ रोजी दिलेल्या अंतरिम निर्णयांन्वये भटके श्वान व भटके जनावर संख्या नियंत्रण, नागरीकांची सार्वजनिक सुरक्षा, प्राणी कल्याण, रेबीज प्रदुर्भाव नियंत्रण, संस्थाच्या जबाबदा-या व करावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर निर्देश दिले आहेत.

संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये केंद्र शासनाच्या पशुपालन व दुग्धविकास विभागाचे सचिव यांनी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना लिहलेल्या दि. ०९.०६.२०२६ रोजीच्या अर्धशासकीय पत्रानुसार (प्रत सोबत) मा. सर्वोच्च न्यायालयाने SOU MOTO रिट याचिका क्र. ०५/२०२५ संदर्भात दि. १९/०५/२०२६ रोजीच्या निर्णयातील (प्रत सोबत) वैयक्तिक व सामूहिक आदेशांबाबत सर्व संबंधीत विभागांना अवगत करुन सदर निर्देशांच्या अनुषंगाने संबंधित विभागांनी आवश्यक ती कार्यवाही करुन विहित वेळेत व विहित नमुन्यात (Compliance Reporting Format) अचूक तपशील / आवश्यक पुराव्यांसह मा. उच्च न्यायालयासमोर अनुपालन शपथपत्र (Compliance Affidavit) सादर करणेबाबत कळवले आहे.

यास्तव, केंद्र शासनाच्या पशुपालन व दुग्धविकास विभागाचे सचिव यांच्या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची आपणांस विनंती आहे.

तसेच या विभागाचे संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये कळवल्यानुसार मा. मुख्य सचिवांना उच्च न्यायालयासमोर स्वतःचे शपथपत्र विहित वेळेत सादर करता यावे याकरिता आपल्या विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (Action Taken Report) दि. १७/०७/२०२६ पर्यंत पशुसंवर्धन विभागात डॉ. नरेश बांगर, अवर सचिव (पदुम-४) यांना प्रत्यक्ष अथवा us.adf४-mh@gov.in या ई-मेल वर मा. न्यायालयाच्या दि. १९.०५.२०२६ रोजीच्या आदेशासोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (Compliance Reporting Format) सादर करण्यास संबंधितांस आदेशित करावे, हि विनंती.

सोबत: वरिलप्रमाणे

(नि. भा.मराळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य.
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्विय सहाय्यक यांना माहितीस्तव.

c\3

## Annexure: Compliance Reporting Format (States/UTs)

| S. No. | Particulars | Details/Status (to be filled by State/UT) |
|---|---|---|
| 1 | Total number of districts in the State/UT | |
| 2 | Number of functional ABC Centres | |
| 3 | Number of districts with at least one ABC Centre | |
| 4 | Details of additional ABC Centres proposed/under establishment | |
| 5 | Total number of veterinarians available for ABC programme | |
| 6 | Total trained staff/personnel deployed for ABC implementation | |
| 7 | Number of stray dogs sterilised (last 6 months) | |
| 8 | Number of stray dogs vaccinated (last 6 months) | |
| 9 | District-wise breakup of sterilisation and vaccination (Chart to be annexed separately) | |
| 10 | Identification of institutions under Direction (A) of order dated 7th November, 2025 | |
| 11 | Steps taken for removal of stray dogs from institutional areas | |
| 12 | Steps taken for securing such premises under Direction (B) of order dated 7th November, 2025 | |

| | | |
|---|---|---|
| 13 | Appointment of Nodal Officers under Direction (C) of order dated 7th November, 2025 | |
| 14 | Inspection mechanism under Direction (D) of order dated 7th November, 2025 | |
| 15 | Statistics regarding Removal and relocation of stray dogs under Direction (E) of order dated 7th November, 2025 | |
| 16 | Compliance with SOPs issued by AWBI | |
| 17 | Decision taken for extension to other public areas | |
| 18 | Availability of anti-rabies vaccines | |
| 19 | Availability of anti-rabies immunoglobulin | |
| 20 | Mechanism for coordination | |
| 21 | Monitoring and reporting mechanism | |
| 22 | Budget allocation for ABC implementation | |
| 23 | Infrastructure gaps identified | |
| 24 | Timeline for addressing gaps | |
| 25 | Creation of helpline number for reporting dog bite incidents | |
| 26 | Creation of dedicated feeding spaces for stray dogs in each municipal ward | |
| 27 | Mechanism for adoption of stray dogs | |
| 28 | Any other relevant information | |

c/5

अ.शा.पत्र क्र. DAHD-१४०४३/१/२०२५ पदुम -४ (१४२२५२८)

डॉ. रामास्वामी. एन (भाप्रसे)
सचिव (पदुम)

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व
मत्स्यव्यसाय विभाग
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दिनांक :- १९ जुन, २०२६

प्रिय परिमल,

भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव-श्वान संघर्षाच्या गंभीर घटनांच्या पार्श्वभूमीवर मा. सर्वोच्च न्यायालयात SOU MOTO रिट याचिका क्र. ०५/२०२५ ही दाखल करुन घेतली आहे. सदर याचिकेवर मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २८/०८/२०२५, दि. ०७/११/२०२५ व दि. १९/०५/२०२६ रोजी दिलेल्या अंतरिम निर्णयान्वये भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव-श्वान संघर्ष टाळण्यासाठी विविध उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. सुनावणीअंती दिलेल्या निर्देशांचे अवलोकन केले असता, मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर बाब अतिशय गांभिर्याने घेतली असल्याचे स्पष्ट होत आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१९/०५/२०२६ रोजी दिलेल्या अंतरिम निर्देशांच्या (प्रत सोबत) अनुपालनाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाययोजना/पुर्ततेचा अहवाल दि.०७/०८/२०२६ पुर्वी मा. मुख्य सचिवांच्या तसेच संबंधीत विभागाच्या सचिवांच्या शपथ पत्राव्दारे मा. उच्च न्यायालयास सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर न्यायनिर्णयात आपल्या विभाग व विभागांतर्गत यंत्रणेशी संबंधित असलेले काही ठळक निर्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१. मा. न्यायालयाच्या दि. २५/०८/२०२५, दि. ०७/११/२०२५ आणि दि. १९/०५/२०२६ रोजीच्या आदेशांचे कोणत्याही शिथिलतेशिवाय काटेकोर पालन करावे. यामध्ये प्रामुख्याने आपल्या अधिनस्त सर्व कृषी महाविद्यालये/ विद्यापीठांमध्ये भटक्या श्वानांचा प्रवेश रोखण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे देखरेखीखाली स्थानीक स्वराज्य संस्था यांचे मदतीने कुंपण/सीमा भिंती, दरवाजे आणि इतर संरचनात्मक किंवा प्रशासकीय उपाययोजनांनी परिसर सुरक्षित करावा.

२. कृषी महाविद्यालये/ विद्यापीठांमध्ये परिसराची देखभाल, स्वच्छता तसेच भटक्या श्वानांचा संस्थेच्या परिसरामध्ये वावर असणार नाही याची खात्री करण्यासाठी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करुन सदर अधिकाऱ्याची माहिती प्रवेशद्वारावर ठळकपणे प्रदर्शित करुन नजिकच्या अधिकारक्षेत्रातील स्थानिक ग्रामिण/नगर संस्था/प्राधिकरणाला कळवावी.

३. प्रत्येक कृषी महाविद्यालये/ विद्यापीठांमध्ये विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना श्वानांच्या आक्रमक स्वभावाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक वर्तन, चावल्यास प्रथमोपचार आणि तात्काळ माहिती देणे याबाबत जागरुकता सत्र आयोजित करावे.

४. भटक्या श्वानांचा संस्थेच्या परिसरामध्ये वावर असणार नाही यासाठी नियुक्त नोडल अधिकारी यांनी नजिकच्या स्थानिक ग्रामिण/नगर संस्था/प्राधिकरणाला कळवुन संस्थेच्या परिसरात आढळणाऱ्या सर्व भटक्या श्वानांना ताबडतोब पकडण्यास सांगुन निर्बिजीकरण व लसीकरणानंतर पुन्हा त्याच ठिकाणी सोडले जाणार नाही, याची खात्री करावी.

५. मा.न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ मधील नियम ११(१९) नियमांनुसार शाळा, रुग्णालये किंवा विमानतळांसारख्या सुरक्षित आणि मर्यादित प्रवेश असलेल्या जागांमध्ये भटक्या कुत्र्यांना परत सोडणे बंधनकारक असले तरीही सार्वजनिक सुरक्षितता लक्षात घेऊन अशा संवेदनशील ठिकाणांना या नियमांच्या संदर्भातील प्रक्रियेतून वगळण्याचा दि. ०७/११/२०२५ चा न्यायालयीन निर्णय पूर्णपणे कायदेशीर आहे; आणि मा. सर्वोच्च न्यायालयाने लोकांच्या सुरक्षेसाठी संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत मिळालेल्या विशेष अधिकारांचा वापर करून दिलेले हे निर्देश कायदेशीर चौकटीशी पूर्णपणे सुसंगत असल्यामुळे अश्या मर्यादित प्रवेश असलेल्या जागांमध्ये निर्बिजीकरण व लसीकरणानंतर भटक्या कुत्र्यांना परत सोडण्यात येऊ नये.

६. मा. न्यायालयाच्या मते, भटक्या श्वानांच्या संरक्षणापेक्षा मानवी जीवनाची सुरक्षा महत्त्वाची आहे आणि यासाठी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे कृषी महाविद्यालये/ विद्यापीठ परिसरात भटक्या श्वानांना खाऊ घालण्याचा आग्रह धरणाऱ्या कोणत्याही प्राणी कल्याण गटाला किंवा विद्यार्थी संघटनेला आता संस्थेच्या प्रमुखांकडे लेखी शपथपत्र (Affidavit) देऊन या श्वानांमुळे चावण्याची एखादी घटना घडल्यास, संबंधित व्यक्तीला झालेल्या दुखापतीसाठी पूर्ण जबाबदारी स्वीकारावी लागेल. असे शपथपत्र न दिल्यास त्यांना संस्थेच्या आवारात श्वानांना खाऊ घालण्यास अजिबात परवानगी दिली जाणार नाही; आणि या नियमाचे उल्लंघन झाल्यास संबंधित संस्था प्रमुख थेट कायदेशीर कारवाईस पात्र असतील.

७. मा. न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण देण्यात आले असून, त्यांनी प्रामाणिक हेतूने (in good faith) केलेल्या कोणत्याही कामासाठी त्यांच्यावर कोणतीही एफआयआर (FIR) किंवा फौजदारी कारवाई केली जाणार नाही; मात्र, जर एखाद्या अधिकाऱ्याने आपल्या अधिकारांचा चुकीच्या हेतूने (mala fides) गैरवापर केला किंवा न्यायालयीन आदेशांचे उल्लंघन केल्याचा प्रथमदर्शनी पुरावा आढळला, तर हे संरक्षण लागू होणार नाही.

८. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २२/०८/२०२५, दि.०७/११/२०२५ आणि दि. १९/०५/२०२६ रोजी दिलेल्या आदेशांचे पालन व्हावे आणि दिलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणीवर सतत देखरेख ठेवता यावी, म्हणून संबंधित राज्याच्या मा. उच्च न्यायालयाने "सुओ मोटो रिट याचिका (दिवाणी) क्रमांक ५/२०२५" या नावाने एक स्वतंत्र याचिका दाखल करून घेण्याचे निर्देश दिले आहेत; तसेच न्यायालयीन आदेशांची पूर्ण अंमलबजावणी होईपर्यंत या याचिकेवर 'कंटिन्युइंग मॅन्डमस' (सतत देखरेख व पुढील आदेश जारी ठेवणे) म्हणून नियमित सुनावणी चालवली जाणार आहे.

९. मा. न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करताना, स्थानिक परिस्थिती व गरजांनुसार त्या निर्देशांची व्याप्ती वाढवण्याचे किंवा त्यात बदल करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मा. उच्च न्यायालयाला असणार आहे.

१०. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. २२/०८/२०२५, दि. ०७/११/२०२५ आणि दि. १९/०५/२०२६ मधील आदेशांचे सातत्याने उल्लंघन करणाऱ्या नगरपालिका, प्रशासकीय प्राधिकरणे आणि संबंधित विभागांतील दोषी अधिकारी कायदेशीर कारवाईस पात्र राहतील; तसेच, मा. न्यायालयाच्या निर्देशांच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध Contempt of Court कारवाई सुरू करण्याचे व अन्य कठोर पावले उचलण्याचे पूर्ण अधिकार मा. उच्च न्यायालयांना असणार आहेत.

११. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे अचूक पालन व्हावे म्हणून, दि. १९/०५/२०२६ च्या आदेशासोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (Compliance Reporting Format) आपल्या विभागाशी संबंधित सर्व अचूक माहिती व आवश्यक पुराव्यांसह स्वतंत्र अनुपालन शपथपत्र मा. उच्च न्यायालयासमोर सादर करण्याचे निर्देश आहेत.

१२. मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार करावयाच्या कार्यवाहीचा समन्वय करणे, इत्यादी.

मा. मुख्य सचिव यांच्या दि. २७/०५/२०२६ रोजीच्या टिपणीतील निर्देशानुसार, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या १९/०५/२०२६ च्या निर्णयातील आपल्या विभागाशी संबंधित वैयक्तिक व सामूहिक आदेशांची माहिती घेऊन, विहित नमुन्यात (Compliance Reporting Format) अचूक तपशील व आवश्यक पुराव्यांसह स्वतंत्र अनुपालन शपथपत्र (Compliance Affidavit) उच्च न्यायालयासमोर वेळेत सादर करावे; तसेच, मा. मुख्य सचिवांना उच्च न्यायालयासमोर स्वतःचे शपथपत्र सादर करता यावे म्हणून आपल्या विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (Action Taken Report) दि. १०/०७/२०२६ पूर्वी पशुसंवर्धन विभागात डॉ. नरेश बांगर, अवर सचिव (पदुम-४) यांना प्रत्यक्ष अथवा us.adf4-mh@gov.in या ई-मेल वर सादर करावा.

आपला स्नेहांकित,

(डॉ. रामास्वामी. एन)

प्रति,

श्री. परिमल सिंह (भाप्रसे),
सचिव,
कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२

दूरध्वनी क्र ०२२-२२०२३११६ Email ID : desk६a.agri-mh@gov.in

---

क्रमांक : संकीर्ण-१५२६/ प्र.क्र.१५४/६ अे दिनांक : २२ जूलै, २०२६.

**तात्काळ/ कालमर्यादा.**

**प्रति,**

1. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे.
2. कुलसचिव,महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी.
3. कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
4. कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
5. कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

विषय:- मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल SOU MOTO रिट याचिका क्र.०५/२०२५ मधील निर्देशांबाबत..

महोदय,

भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव-श्वान संघर्षाच्या गंभीर घटनांच्या पार्श्वभूमीवर मा. सर्वोच्च न्यायालयात SOU MOTO रिट याचिका क्र. ०५/२०२५ ही दाखल करुन घेतली आहे. सदर याचिकेवर मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २८/०८/२०२५, दि. ०७/११/२०२५ व दि. १९/०५/२०२६ रोजी दिलेल्या अंतरिम निर्णयान्वये भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव-श्वान संघर्ष टाळण्यासाठी विविध उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. सुनावणीअंती दिलेल्या निर्देशांचे अवलोकन केले असता, मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर बाब अतिशय गांभिर्याने घेतली असल्याचे स्पष्ट होत आहे.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १९/०५/२०२६ रोजी दिलेल्या अंतरिम निर्देशांच्या अनुपालनाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाययोजना/पुर्ततेचा अहवाल दि.०७/०८/२०२६ पुर्वी मा. मुख्य सचिवांच्या तसेच संबंधीत विभागाच्या सचिवांच्या शपथ पत्राव्दारे मा. उच्च न्यायालयास सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर न्यायनिर्णयात विभाग व विभागांतर्गत यंत्रणेशी संबंधित असलेले काही ठळक निर्देश पुढीलप्रमाणे आहेत -

REGISTRAR OFFICE
DR. P.D.K.V., AKOLA
23 JUL 2026
In. No. 281

O/o Registrar
No. R/325
Date 22/7/26
Dr. P.D.K.V., AKOLA

Estt./Comm./Exam./Gad.

१. मा. न्यायालयाच्या दि. २५/०८/२०२५, दि. ०७/११/२०२५ आणि दि. १९/०५/२०२६ रोजीच्या आदेशांचे कोणत्याही शिथिलतेशिवाय काटेकोर पालन करावे. यामध्ये प्रामुख्याने आपल्या अधिनस्त सर्व कृषी महाविद्यालये/ विद्यापीठांमध्ये भटक्या श्वानांचा प्रवेश रोखण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे देखरेखीखाली स्थानीक स्वराज्य संस्था यांचे मदतीने कुंपण/सीमा भिंती, दरवाजे आणि इतर संरचनात्मक किंवा प्रशासकीय उपाययोजनांनी परिसर सुरक्षित करावा.

२. कृषी महाविद्यालये/ विद्यापीठांमध्ये परिसराची देखभाल, स्वच्छता तसेच भटक्या श्वानांचा संस्थेच्या परिसरामध्ये वावर असणार नाही याची खात्री करण्यासाठी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करुन सदर अधिकाऱ्याची माहिती प्रवेशद्वारावर ठळकपणे प्रदर्शित करुन नजिकच्या अधिकारक्षेत्रातील स्थानिक ग्रामिण/नगर संस्था/प्राधिकरणाला कळवावी.

३. प्रत्येक कृषी महाविद्यालये/ विद्यापीठांमध्ये विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना श्वानांच्या आक्रमक स्वभावाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक वर्तन, चावल्यास प्रथमोपचार आणि तात्काळ माहिती देणे याबाबत जागरूकता सत्र आयोजित करावे.

४. भटक्या श्वानांचा संस्थेच्या परिसरामध्ये वावर असणार नाही यासाठी नियुक्त नोडल अधिकारी यांनी नजिकच्या स्थानिक ग्रामिण/नगर संस्था/प्राधिकरणाला कळवुन संस्थेच्या परिसरात आढळणाऱ्या सर्व भटक्या श्वानांना ताबडतोब पकडण्यास सांगुन निर्बिजीकरण व लसीकरणानंतर पुन्हा त्याच ठिकाणी सोडले जाणार नाही, याची खात्री करावी.

५. मा. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ मधील नियम ११(१९) नियमांनुसार शाळा, रुग्णालये किंवा विमानतळांसारख्या सुरक्षित आणि मर्यादित प्रवेश असलेल्या जागांमध्ये भटक्या कुत्र्यांना परत सोडणे बंधनकारक असले तरीही सार्वजनिक सुरक्षितता लक्षात घेऊन अशा संवेदनशील ठिकाणांना या नियमांच्या संदर्भातील प्रक्रियेतून वगळण्याचा दि. ०७/११/२०२५ चा न्यायालयीन निर्णय पूर्णपणे कायदेशीर आहे; आणि मा. सर्वोच्च न्यायालयाने लोकांच्या सुरक्षेसाठी संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत मिळालेल्या विशेष अधिकारांचा वापर करून दिलेले हे निर्देश कायदेशीर चौकटीशी पूर्णपणे सुसंगत असल्यामुळे अशा मर्यादित प्रवेश असलेल्या जागांमध्ये निर्बिजीकरण व लसीकरणानंतर भटक्या कुत्र्यांना परत सोडण्यात येऊ नये.

६. मा. न्यायालयाच्या मते, भटक्या श्वानांच्या संरक्षणापेक्षा मानवी जीवनाची सुरक्षा महत्त्वाची आहे आणि यासाठी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे कृषी

कोणत्याही प्राणी कल्याण गटाला किंवा विद्यार्थी संघटनेला आता संस्थेच्या प्रमुखाकडे लेखी शपथपत्र (Affidavit) देऊन या श्वानांमुळे चावण्याची एखादी घटना घडल्यास, संबंधित व्यक्तीला झालेल्या दुखापतीसाठी पूर्ण जबाबदारी स्वीकारावी लागेल. असे शपथपत्र न दिल्यास त्यांना संस्थेच्या आवारात श्वानांना खाऊ घालण्यास अजिबात परवानगी दिली जाणार नाही; आणि या नियमाचे उल्लंघन झाल्यास संबंधित संस्था प्रमुख थेट कायदेशीर कारवाईस पात्र असतील.

७. मा. न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण देण्यात आले असून, त्यांनी प्रामाणिक हेतूने (in good faith) केलेल्या कोणत्याही कामासाठी त्यांच्यांवर कोणतीही एफआयआर किंवा फौजदारी कारवाई केली जाणार नाही; मात्र, जर एखाद्या अधिकाऱ्याने आपल्या अधिकारांचा चुकीच्या हेतूने (mala fides) गैरवापर केला किंवा न्यायालयीन आदेशांचे उल्लंघन केल्याचा प्रथमदर्शनी पुरावा आढळला, तर हे संरक्षण लागू होणार नाही.

८. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २२/०८/२०२५, दि.०७/११/२०२५ आणि दि. १९/०५/२०२६ रोजी दिलेल्या आदेशांचे पालन व्हावे आणि दिलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणीवर सतत देखरेख ठेवता यावी, म्हणून संबंधित राज्याच्या मा. उच्च न्यायालयाने "सुओ मोटो रिट याचिका (दिवाणी) क्रमांक ५/२०२५" या नावाने एक स्वतंत्र याचिका दाखल करून घेण्याचे निर्देश दिले आहेत; तसेच न्यायालयीन आदेशांची पूर्ण अंमलबजावणी होईपर्यंत या याचिकेवर 'कॉंटिन्युइंग मैन्डमस (सतत देखरेख व पुढील आदेश जारी ठेवणे) म्हणून नियमित सुनावणी चालवली जाणार आहे.

९. मा. न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करताना, स्थानिक परिस्थिती व गरजांनुसार या निर्देशांची व्याप्ती वाढवण्याचे किंवा त्यात बदल करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मा. उच्च न्यायालयाला असणार आहे.

१०. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. २२/०८/२०२५, दि. ०७/११/२०२५ आणि दि. १९/०५/२०२६ मधील आदेशांचे सातत्याने उल्लंघन करणाऱ्या नगरपालिका, प्रशासकीय प्राधिकरणे आणि संबंधित विभागांतील दोषी अधिकारी कायदेशीर कारवाईस पात्र राहतील; तसेच, मा. न्यायालयाच्या निर्देशांच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिका-यांविरुद्ध Contempt of Court कारवाई सुरू करण्याचे व अन्य कठोर पावले उचलण्याचे पूर्ण अधिकार मा. उच्च न्यायालयांना असणार आहेत.

११. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे अचूक पालन व्हावे म्हणून, दि. १९/०५/२०२६ च्या आदेशासोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (Compliance Reporting Format) आपल्या

विभागाशी संबंधित सर्व अचूक माहिती व आवश्यक पुराव्यांसह स्वतंत्र अनुपालन शपथपत्र मा. उच्च न्यायालयासमोर सादर करण्याचे निर्देश आहेत.

१२. मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार करावयाच्या कार्यवाहीचा समन्वय करणे, इत्यादी.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या १९/०५/२०२६ च्या निर्णयातील कृषि विद्यापीठे व कृषि परिषदेशी संबंधित वैयक्तिक व सामूहिक आदेशांची माहिती घेऊन, विहित नमुन्यात (Compliance Reporting Format) अचूक तपशील, शासनास तात्काळ सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपला,

(रोहिदास खोकले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

240
Dt. 27/7/26